आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

मंगळवार दिनांक ०५ नोव्हेंबर २०२४

ठळक बातम्या

1. विधानसभा निवडणुकीसाठी ४ हजार १४० उमेदवार रिंगणात; विदर्भासह राज्यभरात प्रचाराची रणधुमाळी सुरू.
2. 20 नोव्हेंबर रोजी होणाऱ्या राज्य विधानसभा निवडणुकीमध्ये एकूण नऊ कोटी सत्तर लाख 25 हजार 119 मतदार बजावणार मतदानाचा हक्क.
3. राज्याच्या पोलीस महासंचालक पदावर संजय वर्मा यांची आज नियुक्ती.
4. भारताला लाभलेल्या थोर मार्गदर्शकांमध्ये भगवान गौतम बुद्धांचं स्थान अढळ असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं पहिल्या आशियाई बौद्ध परिषदेत प्रतिपादन.

---------------------------------------

निवडणूक एकूण उमेदवार

महाराष्ट्रात २० नोव्हेंबरला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठीचं चित्र स्पष्ट झालं आहे. विधानसभा निवडणुकीसाठी ४ हजार १४० उमेदवार रिंगणात आहेत. राज्यातल्या २८८ मतदारसंघात ७ हजार ७८ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते; उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या कालच्या शेवटच्या दिवसापर्यंत २ हजार ९३८ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. दरम्यान, काल अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी नागपूर जिल्ह्यातील बारा विधानसभा क्षेत्रातून एकूण 72 उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले आहेत. त्यामुळे नागपूर शहराच्या सहा विधानसभा क्षेत्रात 117 आणि नागपूर ग्रामीण मधून 100 असे एकूण 217 उमेदवार आता निवडणूक लढवणार आहेत.

---------------------------------------

विदर्भातील बंडखोरी

काल अर्ज माघारी घेण्याचा शेवटचा दिवस होता. अखेरच्या दिवसापर्यंत महाविकास आघाडी आणि महायुतीतील अनेक बंडखोरांनी आपले अर्ज मागे घेतले नाहीत. त्यामुळे अनेक ठिकाणी भाजप विरुद्ध राष्ट्रवादी अजित पवार गट तर महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव ठाकरे गटाविरुद्ध काँग्रेस अशी बंडखोरी पाहायला मिळत आहे. यामध्ये प्रामुख्याने रामटेक मध्ये उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना उमेदवाराविरुद्ध काँग्रेसचे राजेंद्र मुळक यांनी अर्ज कायम ठेवला असून ते बॅट हे

त्यांचं बोध चिन्ह आहे.  तर गडचिरोली जिल्ह्यातील अहेरीत महायुती मधील भाजप बंडखोर अमरीश राव आत्राम यांनी देखील अर्ज कायम ठेवला आहे. इथ त्यांची लढत राष्ट्रवादी अजित पवार गटाचे विद्यमान मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्याशी होईल. त्याचप्रमाणे पूर्व नागपूर मध्ये भाजपचे अधिकृत उमेदवार आमदार कृष्णा खोपडे यांच्या विरोधात अजित पवार गटाच्या आभा पांडे लढणार आहेत.  काटोल मध्ये माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचे पुत्र सलील यांच्याविरुद्ध काँग्रेसचे याज्ञवलक् जिचकार यांनी बंडखोरी केली आहे. तर अमरावती जिल्ह्यातील बडनेराचे अपक्ष आमदार रवी राणा यांच्या विरोधात भाजप नेते तुषार भारतीय यांनी बंड केल आहे. भाजपने ही जागा राणा यांच्यासाठी सोडली होते. तसेच दर्यापूर मतदारसंघात शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाचे उमेदवार अभिजीत अडसूळ यांच्या विरोधात राणा यांच्या युवा स्वाभिमानचे रमेश बुंदिले निवडणूक लढणार आहेत.  सिंदखेड राजा मतदारसंघात शिंदे गटाचे शशिकांत खेडेकर आणि अजित पवार गटाचे मनोज कायंदे हे रिंगणात आहेत. याशिवाय हिंगणघाट, वरोरा, चंद्रपूर बल्लारशा, देवरी, अर्जुनी मोरगाव साकोली, भंडारा, तुमसर अशा अनेक ठिकाणी बंडखोर उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतलेले नाहीत.

---------------------------------------

सुनिल तटकरे

दरम्यान अपवादात्मक मतदारसंघात अर्ज दाखल झाले आहेत मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अजित पवार यांच्याशी एकत्रित चर्चा झाली आहे. जे-जे मतदारसंघ सोडण्याचे निर्धारित झाले होते त्याठिकाणी एकत्रित काम कसे करता येईल यासाठी युध्दपातळीवर आम्ही प्रयत्न करत आहोत. एक-दोन दिवसात सर्वांची समजूत घालून त्या - त्या मतदारसंघातील वातावरण योग्य पध्दतीने पूरक होईल असा प्रयत्न नक्कीच आहे अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

---------------------------------------

प्रचार सभा/रॅली-नागपूर

विविध राजकीय नेत्यांच्या प्रचारसभांना राज्यात आजपासून सुरुवात होत आहे. प्रचाराला केवळ १४ दिवसांचा कालावधी असल्यानं प्रभावी प्रचारावर उमेदवारांचा भर दिसून येत आहेत. भाजप नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री आणि दक्षिण पश्चिम नागपूरचे उमेदवार देवेंद्र फडणवीस यांनी आज प्रचाराचा नारळ फोडला. त्यांनी आज जनसंपर्क रॅलीच्या मध्यमातून पेट्रोल पंप चौक हिंगणा नाका इथून प्रचाराला सुरवात केली. यावेळी माध्यमांशी बोलताना नागपूरमधील सर्व मतदार संघांतून महायुतीचे

उमेदवार निवडून येतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार विकास ठाकरे यांनी आज प्रचारार्थ सायंकाळी 4:30 वाजता गिट्ठीखदान हनुमान मंदिर पासून जनआशीर्वाद यात्रेला सुरुवात केली. दरम्यान आज उत्तर नागपूरचे आमदार डॉ.नितीन राऊत देखील विविध भागात प्रचार करणार आहेत.

---------------------------------------

प्रचार सभा/रॅली-विदर्भ

भंडारा विधानसभा मतदार संघातील काँग्रेसच्या उमेदवार पूजा ठवकर यांनी प्रचाराला आरंभ केला आहे. आज शहरात प्रचार रॅली काढण्यात आली. या रॅलीत काँग्रेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते बहुसंख्येने सहभागी झाले होते. भंडारा विधानसभा मतदार संघातील शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे बंडखोर उमेदवार नरेंद्र पहाडे यांनी सुद्धा आज प्रचारास सुरुवात केली आहे. या रॅलीत पथ नाट्य देखील सादर केलं जात आहे. गोंदिया आमगाव देवरी विधानसभा क्षेत्राचे महायुतीचे उमेदवार संजय पुराम यांनी आज देवरी तालुक्याच्या हरदोली गावातून प्रचाराला सुरवात केली. संजय पुराम यांना भारतीय जनता पक्षाने सलग तिसऱ्यांदा निवडणूक लढण्याची संधी दिली आहे. 2014 ते 2019 पर्यंत आमगाव देवरी विधानसभा क्षेत्रात आमदार असताना केलेल्या विकास कामांमुळे आपलाच विजय होईल असा विश्वास पुराम यांनी व्यक्त केला आहे. आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यवतमाळ जिल्ह्यातील वणी आणि राळेगाव मतदारसंघातील उमेदवारांसाठी जाहीर प्रचार सभा घेणार आहेत. गोंदिया विधानसभा क्षेत्राचे महायुती उमेदवार विनोद अग्रवाल यांनी आज पासून प्रचाराला सुरवात केली असून आपलाच विजय होईल असा विश्वास विनोद अग्रवाल यांनी व्यक्त केला आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उद्या अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज मोझरी इथ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाधी मंदिरा लगतच्या प्रांगणात महायुतीचे तिवसा विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार राजेश वानखडे यांच्या निवडणूक प्रचारार्थ जाहीर सभा घेणार आहेत.

---------------------------------------

राहुल गांधी

काँग्रेस व महाविकास आघाडी विधानसभेच्या निवडणुकीत पूर्ण तयारीने उतरली असून काँग्रेस पक्ष उद्या दिनांक ६ नोव्हेंबर रोजी प्रचाराचे रणशिंग फुंकणार आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे उद्या बुधवारी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत असून नागपुरात दुपारी १ वाजता 'संविधान सन्मान संमेलनाला' उपस्थित राहणार आहेत. तर संध्याकाळी ५

वाजता मुंबईच्या वांद्रे कुर्ला संकुलातील MMRDA मैदानात मविआची 'महाराष्ट्र स्वाभिमान सभा' होणार असून, या सभेत विधानसभा निवडणुकासाठी काँग्रेस पक्षाच्या गॅरंटी जाहीर करणार आहेत, अशी माहिती प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी दिली आहे.

----------------------------------------

एकूण मतदार

निवडणूक आयोगाद्वारा आज जारी केलेल्या प्रसिद्धी पत्रकानुसार दिनांक 20 नोव्हेंबर रोजी होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये एकूण नऊ कोटी सत्तर लाख 25 हजार 119 पात्र मतदार आहेत. त्यापैकी पुरुषांची संख्या पाच कोटी बावीस हजार 739 इतकी आहे तर स्त्रियांची संख्या चार कोटी 69 लाख 96 हजार 279 इतकी आहे. तृतीयपंथी मतदारांची संख्या राज्यभरात सहा हजार 101 इतकी नोंदविण्यात आली आहे तर दिव्यांग मतदारांची संख्या सहा लाख 41 हजार 425 इतकी आहे. शहरी भागातील मतदान केंद्रांची संख्या 42 हजार 604 इतकी असून ग्रामीण भागात 57,582 मतदान केंद्र असतील. शहरी भागातील मतदारांची अनास्था लक्षात घेऊन शहरी भागातील मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करावे यासाठी राज्यात पुणे, मुंबई, ठाणे इत्यादी शहरांमध्ये अतिउंच इमारती, सहकारी गृहनिर्माण संस्थांची संकुले यामध्ये एकूण 1 हजार एकशे ८१ मतदान केंद्र उभारण्यात आलेली आहे. तसेच झोपडपट्टी भागात देखील 210 मतदान केंद्रे उभारण्यात आलेली आहे. राज्यभरात सी व्हीजील अँपवर आचारसंहिता भंगाबाबतच्या 2 हजार 469 तक्रारी आजवर प्राप्त झाल्या असून त्यापैकी जवळपास 99 टक्के तक्रारी निकाली काढण्यात आल्या असल्याची माहिती निवडणूक आयोगाद्वारे जारी पत्रकात कळविण्यात आली आहे.

----------------------------------------

स्त्री मतदारांची संख्या जास्त

विधानसभा निवडणुकीसाठी २८८ मतदारसंघातील सुमारे ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. विदर्भातील गोंदिया आणि भंडारा जिल्हयात महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांच्या तुलनेत अधिक असल्याचे निवडणुक आयोगाने दिलेल्या माहितीत कळविले आहे. या व्यतिरिक्त रत्नागिरी, नंदुरबार, आणि सिंधुदुर्ग या जिल्हयांत देखील महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक आहे.

----------------------------------------

संजय वर्मा

राज्याच्या पोलीस महासंचालक पदावर आज संजय वर्मा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते १९९० च्या तुकडीचे भारतीय पोलीस सेवेचे अधिकारी आहेत. सध्या ते कायदा आणि तंत्रज्ञान विषयक पोलीस महासंचालक म्हणून कार्यरत आहेत. एप्रिल २०२८ मध्ये ते निवृत्त होणार आहेत. काँग्रेस आणि इतर पक्षांनी केलेल्या तक्रारीनंतर केंद्रीय निवडणूक आयोगानं काल रश्मी शुक्ला यांना पोलीस महासंचालक पदावरून हटवण्याचे आणि त्यांची तात्काळ बदली करण्याचे आदेश दिले होते. तसंच विवेक फणसळकर यांच्याकडे या पदाचा तात्पुरता कार्यभार सोपवला होता.

---------------------------------------

राष्ट्रपती/ आशियाई बौद्ध परिषद

भारताला प्रत्येक युगात थोर मार्गदर्शक लाभले असून, यामध्ये भगवान गौतम बुद्धांचं स्थान अढळ आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. त्या आज नवी दिल्ली इथं आयोजित पहिल्या आशियाई बौद्ध परिषदेला संबोधित करत होत्या. जगभर प्रसारित बौद्ध धर्माचा सन्मान करण्यासाठी सांस्कृतिक मंत्रालयानं आंतरराष्ट्रीय बौद्ध महासंघाच्या सहकार्यानं ही दोन दिवसीय परिषद आयोजित केली आहे. 'आशियाला बळकट करण्यात बौद्ध धम्माची भूमिका', ही या परिषदेची संकल्पना आहे. जग आज विविध आघाड्यांवर अस्तित्वासाठी झगडत असताना, बौद्ध समुदायाकडे मानवाला देण्यासारखं खूप काही आहे, असं प्रतिपादन करताना बौद्ध धर्माचा मध्यवर्ती संदेश शांतता आणि अहिंसेवर केंद्रित असून, आज जगाला करुणेची गरज आहे, असं राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या.

---------------------------------------

संसदेच हिवाळी अधिवेशन

संसदेचे हिवाळी अधिवेशन येत्या 25 नोव्हेंबर पासून 20 डिसेंबर या कालावधीत होणार असल्याची माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली आहे. 26 नोव्हेंबर रोजी संविधान दिन संविधान सदनच्या सेंट्रल हॉलमध्ये साजरा केला जाणार आहे.

---------------------------------------

हवामान

नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्याने येत्या काही दिवसांत विदर्भातील सर्व जिल्ह्यात हवामान कोरडे राहण्याचा अंदाज वर्तविला आहे. मागील २४ तासांत किमान तापमानाची नोंद गोंदिया इथं 17 पूर्णांक 4 अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आली. तर कमाल तापमान अमरावती इथं ३५ पूर्णांक २ अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं.